# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

प्रकरण क्र.सीजीआरएफ/एझेड/औबाद / ५१५ /२०१४ /३६

तक्रार दाखल दिनांक ;- १५/०७/२०१४
निकाल दिनांक ;- ०९/०९/२०१४

श्री. प्रकाश बाबुराव काळे, तक्रारदार
उस्मानपुरा, औरंगाबाद ,

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
शहरी विभाग, औरंगाबाद

गैरअर्जदार क्रमांक १

जी.टी.एल. -

गैरअर्जदार क्रमांक २

मंच सदस्य

डॉ. भास्कर गो.पालवे, अध्यक्ष
श्री. विलासचंद्र . सु. काबरा सदस्य

# निर्णय

अर्जदाराने ग्राहक ग्रा-हाणे निवारण मंचासमोर अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनीयम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराच्या तक्रारीची एक प्रत दिनांक १५.०७.२०१४ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी व मे. जी.टी.एल कंपनी औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ३०.०७.२०१४ रोजी ठेवण्यात आली. ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा तपशील खालीलप्रमाणे आहे

१ ) अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचाकडे दिनांक १४.०५.२०१३ रोजी तक्रार क्रमांक सीजीआरएफ / एझेड / यु / ४४० / २०१३ / २४ दाखल केली होती तक्रारीवर मंचाने दिनांक २७.०८.२०१३ रोजी निकाल ग्राहकाचे बाजुने दिला होता सदर आदेशाचे पालन गैरअर्जदार क्रमांक २ यांनी केले नसल्याचे नमुद आहे गैरअर्जदाराने ( मे. जी.टी.एल ) ग्राहकास व्याज व डी.पी.सी. रक्कम रुपये २०७६८ व पैसे १७ भरण्यासाठी दिनांक ०३.०७.२०१४ रोजी नोटीस पाठविली. अन्यथा १५ दिनसानंतर विदयुत पुरवठा तोडण्यात येईल अशा स्वरुपाची नोटीस देण्यात आली .

२ ) ग्राहकाने विदयुत पुरवठा न तोडण्यासंबधी गैरअर्जदार क्रमांक २ मे. जी.टी.एल. औरंगाबाद यांना आदेश दयावेत अशी मागणी केलेली आहे त्याचप्रमाणे ग्राहकाने गैरअर्जदार क्रमांक २ मे. जी.टी.एल औरंगाबाद यांनी ग्राहक गा-हाणे मंच औरंगाबाद परिमंडल यांच्या आदेशाचे पालन न केल्यामुळे त्यांचे विरोधात एम.ई आर.सी. यांचेकडे तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.

ग्राहकाने खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

१ ) गैरअर्जदारास विदयुत पुरवठा खंडीत करु नये असे आदेश दयावेत.

२ ) गैरअर्जदाराने ग्राहकास सदर तक्रारीचा खर्च म्हणून रु. १०,०००/- नुकसान भरपाई दयावी

ग्राहक व गैरअर्जदार मे. जी.टी.एल. औरंगाबाद यांनी दाखल केलेल्या कागद पत्रा वरुन व झालेल्या सुनावणीतील माहितीनुसार हे मंच खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१ ) ग्राहकाने , ग्राहक गा-हाणे निवारण मंच यांच्या आदेशाचे पालन न केल्यामुळे गैरअर्जदार मे. जी.टी.एल.औरंगाबाद यांचे विरध्द महाराष्ट्र राज्य विदयुत आयोग यांचेकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीचा निकाल लागे पर्यन्त ग्राहकाचा विदयुत पुरवठा तोडू नये

२ ) वरील आदेशाचा अनुपालन अहवाल ३० दिवसाचे आत मंचास सादर करावा

**स्वाक्षरित**
**डॉ. भास्कर गो.पालवे,**
**अध्यक्ष**

**स्वाक्षरित**
**श्री. विलासचंद्र . सु. काबरा**
**सदस्य**